SOCIAL SCIENCE REPORTER
ISSN 2231-0789
Availlable online at http://www.thematicsjournals.org

# मानवी हक्क आणि बालक

**प्रा. एल. बी. डोंगरे**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख), हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, ता. हिमायतनगर, नांदेड (महाराष्ट्र).

जागतिकीकरण, दहशतवाद, पर्यावरणवाद याबरोबरच मानवी हक्कानेही आंतरराष्ट्रीय संघटना, अभ्यासक, सामाजिक विचारधुरीणांच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय बनला आहे. मानवी हक्काबाबत सॉक्रेटीस पासून अलीकडच्या रुसोपर्यंत विविध राजकीय विचारवंतांनी आपले मौलिक विचारधन मांडले आहे. १२१५ चा मॅग्नाकार्टा आणि १७८९ फ्रेंच राज्यक्रांती मानवी हक्काच्या प्रस्थापनेसाठी दिलेला पहिला लढा होता. मानवी हक्क मानवी प्रतिष्ठा आणि मानवाच्या व्यक्तिमत्व विकासाची परिपुर्ण कल्पना आहे. मानवी हक्काच्या प्राप्तीशिवाय व्यक्ति आपल्यातील चांगुलपणाचा विकास करु शकत नाही. मानवी हक्काच्या प्राप्तीशिवाय व्यक्ति चांगले जीवन जगु शकत नाही. म्हणुन मानवी हक्क व्यक्तिच्या व्यक्तिमत्व विकासाची पुर्व अट आहे. मानव समाजामध्ये सामुदायिकपणे जीवन जगत असतांना सर्वांना समान हक्क असावेत अशी रास्त भुमिका असते. परंतू समाजात जात, धर्म, वंश, वर्ण, लिंग या आधारावर मानवा-मानवात भेदाभेद करून त्याचे मानवी हक्क हिसकावून घेतले आहे. भारताच्या संदर्भात जातीच्या आधारे स्पृश्य-अस्पृश्य असा भेद करुन अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाला पशुपेक्षाही हिन दर्जाची वागणुक दिली गेली. अमेरिकेत वर्णाच्या आधारे मालक गुलाम असा भेदाभेद करुन कृष्णवर्णीय माणसाला गुलाम बनवले होते.

मानवी हक्क हे व्यक्तिशी निगडीत असल्याने त्याचे विविध पैलू आपणांस सांगता येतात. भारताच्या संदर्भात महिलांचे मानवी हक्क, जाती-जमातीचे मानवी हक्क, भटक्या विमुक्त जमातीचे मानवी हक्क, कामगारांचे मानवी हक्क, बालकांचे मानवी हक्क असे विविध पैलू सांगता येतात. प्रस्तुत शोधप्रबंधात बालकांच्या हक्काविषयी अध्ययन करण्यात येईल. जगातील सर्व बालकांचे हक्क हे सुरक्षित राहावे यासाठी राष्ट्र संघाने १९२४ ला जिनेव्हा घोषणापत्र प्रकाशित केले. त्यानंतर युनायटेड नेशन्सने १९४६ रोजी United Nations International Childrens Emergency Fund या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना केली आहे. भारतातील सर्व बालकांचे हक्क सुरक्षित राहावेत यासाठी भारतीय घटनाकारांनी मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वामध्ये महत्वपुर्ण घटनात्मक तरतुदी करुन बालकांच्या व्यक्तिमत्व विकासातील अडथळे दूर करुन विकासाचा मार्ग प्रशस्त केला. बालक हा राष्ट्राची एक महत्वपुर्ण संपत्ती असते. बालक हा राष्ट्राचा भावी आधारस्तंभ असतो. बालकाच्या भवितव्यावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. बालकांना त्यांचे हक्क प्रदान करुन त्यांना सक्षम बनविणे हे राष्ट्राचे व समाजातील सर्व घटकांची जबाबदारीच नाही तर आद्यकर्तव्य आहे. म्हणुन भारत सरकारने १९९३ ला National Human Rights Commission ची स्थापना केली. शासनाने बालकांची विशेष काळजी घेण्यासाठी स्वतंत्र महिला व बालकल्याण मंत्रालयाची स्थापना केली. बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय संघटना घटनात्मक तरतुदी, कायदे, आयोग मंत्रालय इत्यादी घटक कार्य करीत असतांना सुध्दा वार्षिक अहवालाच्या माध्यमातून प्रकाशित होणाऱ्या आकडेवारीतून बालकांच्या हक्कांची चिंताजनक परिस्थिती दिसून येते.

बालकांच्या निकोप वाढीसाठी हक्कही पुर्व अट आहे. जगातील सर्व राष्ट्रांनी आपल्या बालकांचे हक्क सुरक्षित राहावेत यासाठी तशा प्रकारची व्यवस्था निर्माण केली असली तरी त्याचे वास्तव अतिशय चिंताजनक आहे. आजही हजारो बालक आपल्या हक्काच्या प्राप्तीपासून वंचित आहेत. म्हणुन बालकांचे हक्क आणि त्यांचे वास्तव आपणांस पुढील प्रमाणे सांगता येते.

**१) शिक्षणाचा हक्क आणि बालक :-**

व्यक्तिच्या व्यक्तिमत्व विकासाचे साधन म्हणजे शिक्षक होय. प्रत्येक बालकाला शिक्षण मिळावे यासाठी घटनेने ६ ते १४ वर्षाखालील सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत राज्य नियंत्रीत दिले जाईल अशी व्यवस्था भारतासह बहुतांश राष्ट्रांनी केली आहे. शासकर्त्यांनी शिक्षण देणे हे आपले कर्तव्य म्हणुन पार पाडले असले तरीही अनेक विविध कारणांमुळे देशातील बालक शिक्षणाच्या हक्कापासून वंचित आहेत. भारतात ६ ते १४ वर्ष वयोगटातील जवळपास ६३ दश लक्ष बालक शाळेपासून वंचित आहेत. भारतात ६०% प्राथमिक शाळेमध्ये १ ली ते ५ वी पर्यंत पाचही वर्गासाठी १ किंवा २ शिक्षक आहेत. ५,२८,००० शाळांमध्ये मुलांना पिण्यासाठी शुध्द पाणी मिळत नाही. ८५% शाळांमध्ये मुलांसाठी स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था नाही अशा प्रकारचे विदारक चित्र भारतात आहे.यासाठी शासनाने अधिक जागरुकतेने आपली कर्तव्ये पार पाडल्यास बालकांना आपल्या शैक्षणिक हक्काचा उपभोग घेता येईल.

**२) आरोग्याचा हक्क आणि बालक :-**

बालकाच्या निकोप वाढीसाठी आरोग्यदायी जीवन महत्वाचे आहे. म्हणून बालकाच्या आरोग्याची काळजी घेणे त्या त्या राज्याच्या

शासनाचे आद्यकर्तव्य आहे. शासनाने बालकाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विविध उपक्रम, कार्यक्रम, योजना, सुविधा उपलब्ध करुन दिल्या असल्या तरीही बालकांच्या आरोग्याचे वास्तव अपेक्षाभंग करणारे आहे. भारतात दरवर्षी १५ लाख बालकांचा अतिसारामुळे मृत्यू होतो. दरवर्षी २५ लाख बालकांचा बालमृत्यू होतो. ३६% बालक कुपोषणाने ग्रस्त आहेत. १७% बालकांना पिण्यासाठी शुध्द पाणी मिळत नाही. अशा प्रध्दतीने भारतातील हजारो बालक टि.बी., एड्स, पोलीओ, कुष्ठरोग, सिकलसेल यासारख्या गंभीर स्वरुपाच्या आजाराने ग्रस्त आहेत. योग्य उपचाराअभावी हजारो बालकांचा बळी जातो. म्हणुन बालकांच्या आरोग्याची देखभाल करण्यासाठी प्रभावी सक्षम अशी आरोग्य यंत्रणा निर्माण करुन प्रभावी अंमलबजावणी केल्यास सर्व बालकांना आरोग्य संपन्न जीवन प्राप्त होईल.

**३) जगण्याचा हक्क आणि बालक :-**

जगण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीला मिळालेला एक नैसर्गीक हक्क आहे. जन्मलेल्या प्रत्येक बालकाला जगण्याचा हक्क असतो. लैंगिक भेदभावातून बालकाचा जन्म होण्या आधीच त्याच्या जगण्याचा हक्क हिरावून घेतल्या जातो. स्त्री भ्रुणहत्येच्या माध्यमातून कोवळया कळया उमलण्याआधीच त्यांना खुडून टाकले जाते. म्हणून स्त्री भ्रुणहत्या भारतीय समाजाला लागलेला एक कलंक आहे. लहान बालकांच्या आरोग्याच्या सुविधा ग्रामीण भागात अतिशय दयनिय आहेत. बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी शासनामार्फत सकस व पोषणयुक्त आहार अंगणवाडयांच्या माध्यमातून पुरविला जातो. परंतू बऱ्याच ठिकाणी या पोषणयुक्त आहाराचे वाटप केले जात नाही. तर पोषणयुक्त आहारामध्ये अपहार केला जातो. जे पोषणयुक्त आहाराचे रक्षक आहेत तेच त्याचे भक्षक झाले आहेत. शहरातील बऱ्याच वस्त्यांमध्ये ३०० कुटूंबासाठी ५ शौचालयाची व्यवस्था आहे. शहरातील अनेक बालके संसर्गजन्य आजाराने नेहमी आजारी पडतात. म्हणून बालकांना जगण्याचा हक्क प्रदान करण्यासाठी शासनाने बालकांसाठी जगणे म्हणजे नुसते जगणे नसून पोषणयुक्त आहार, आरोग्याच्या सोयी, पर्यावरणाची उपलब्धता, शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिल्यास बालकांच्या जगण्याचा मार्ग सुकर होईल.

**४) विकासाचा हक्क आणि बालक :-**

बालकांच्या सर्वांगीण विकासाचे साधन म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाबरोबर बालकांच्या सुप्त गुणांचा विकास व्हावा म्हणुन शासनाने सर्व शिक्षा अभियान निर्माण केले आहे. ज्याचे ब्रिद वाक्य सारे शिकुया पुढे जाऊया असे आहे. टि.व्हि.वरील सर्व शिक्षा अभियानाची जी जाहिरात केली जाते त्याप्रमाणे शिक्षणाची परिस्थिती वास्तवात दिसून येत नाही. महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा या गावातील दुसऱ्या इयत्तेत शिकणारी मुलगी शाळेत पाणी नसल्याने पाणी पिण्यासाठी विहीरीवर गेली असता तिचा विहीरीत पडून मृत्यू झाला. शाळेत बालकांना संगणक ज्ञानाची ओळख व्हावी म्हणून संगणकाची व्यवस्था करण्यात आली आहे. परंतू शाळेत संगणक असेल तर वीज नाही विज असेल तर संगणक शिक्षक नाहीत. भारतातील हजारो शाळेमध्ये संगणक धुळखात पडून आहेत. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून बौध्दिक विकासाशी संबंधित असणारी पुस्तके बालकांना वाटप न केल्यामुळे नांदेड जिल्हयातील शिक्षणाधिकारी यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे. अशा पध्दतीची प्रशासकीय अधिकाऱ्यांची उदासिनता दिसून येते.

लहान बालकांचा विकास होण्यासाठी अंगणवाडीमध्ये चांगल्या सुविधा नाहीत. लहान बालकांना खेळण्यासाठी व आपल्यातील सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी बागा, मैदाने, क्रिडांगणांची व्यवस्था बहुतांश ठिकाणी नाही. बालकाच्या विकासाचे प्राथमिक केंद्र म्हणजे अंगणवाडी आहे. अंगणवाडीमध्ये अंगणवाडी सेविकेला शिकविण्याऐवजी बालकांच्या विकासाला चालना देण्याऐवजी तिचा पुर्ण वेळ रजिस्टर मधील नोंद भरण्यात जातो. म्हणून बालकांच्या विकासासंबंधीचे वास्तव गंभीर आहे. बालकांच्या विकासातील जे गतिरोध आहेत त्यांना दुर करुन विकासाला चालना दिली पाहिजे आणि शासनाने आपल्या बाल विकासाच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास बालकांच्या विकासाचा मार्ग प्रशस्त होईल.

**५) संरक्षणाचा हक्क आणि बालक :-**

बालकांच्या निकोप विकासासाठी त्यांचे संरक्षण झाले पाहिजे. त्यांचे संरक्षण करणे समाजातील विविध घटकांची जबाबदारी आहे. म्हणून बालकांना आपल्या संरक्षणाचा हक्क मिळाला पाहिजे. आधुनिक युगातही रुढी, प्रथा, परंपरेच्या माध्यमातून लहान बालकांचा नरबळी दिला जातो. शाळा, विद्यालयातील बालके सुरक्षित नाहीत. शाळा, विद्यालयातील शिक्षकांकडूनच बालकांसोबत गैरवर्तन केले जातात. कायदयाचे संरक्षण असतांनासुध्दा लहान मुलींचे वयाच्या १५ व्या वर्षी विवाह लावले जातात. शाळकरी मुलांना पळून नेवून त्यांची हत्या करुन त्यांच्या अवयवांची तस्करी करणारा पंदेरसिंह याने निठारी हत्याकांड घडवून बालकांचा बळी घेतला आहे. नोयडातील निठारी हत्याकांड म्हणजे मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे. अपंग व एच.आय.व्हि.ग्रस्त बालकांना सन्मानाने जगण्याचे संरक्षण मिळाले पाहिजे. रस्त्यांवर, रेल्वेस्थानकावर असणाऱ्या बालकांचे लैंगिक शोषण केले जाते. फेब्रुवारी २०१२ मध्ये दिल्लीतील अनाथालयात तेथील व्यवस्थापकाकडूनच १५ ते २० मुलांबरोबर लैंगिक गैरवर्तन केल्याची घटना उघडकीस आली आहे. शाळेत जाणाऱ्या अल्पवयीन मुलींना पळवून नेवून बलात्कार केल्याच्या अनेक घटना भारतात घडत आहेत. अशा घटनांवर लगाम घालण्यासाठी सरकारने बालकांच्या संरक्षणासाठी आदर्श संरक्षण संहिता तयार करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी केल्यास बालकांना आपल्या संरक्षणाचा हक्क मिळेल.

**निष्कर्ष** :

बालक हा राष्ट्राची महत्वपुर्ण संपत्ती असते. त्याच्या भवितव्यावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी पर्याप्त प्रमाणात हक्क मिळाले पाहिजेत. अशा निष्पाप बालकांना त्यांच्या निकोप विकासासाठी योग्य ते हक्क प्राप्त करुन देण्याचे आद्यकर्तव्य शासनाचे आणि समाजाचे

आहे. बालकांना पर्याप्त प्रमाणात हक्क मिळावेत यासाठी समाज व शासन आणि स्वयंसेवी संस्था, संघटना यांनी हक्काप्रती जाणीव जागृती निर्माण केली पाहिजे. मुल्याधिष्ठित, कर्तव्यदक्ष, नितीमान, संवेदनशील समाज निर्माण झाल्यास आपल्या देशातील सर्व बालकांचे हक्क सुरक्षित राहतील आणि त्यांच्या विकासाला चालना मिळेल.

**संदर्भसूची :**


| अ.क्र. | संदर्भग्रंथाचे नांव | लेखक | प्रकाशन |
|---|---|---|---|
| [१] | मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ | ॲड.अभया शेलकर | नाशिक लॉ हाऊस, औरंगाबाद. |
| [२] | मानवी अधिकारांचा ऐतिहासिक आढावा उद्देश आणि उपलब्धी | संपा. डॉ.व्हि.एस.इंगळे | अल्फा प्रकाशन, नांदेड. |
| [३] | मानव अधिकार | संपा.डॉ.व्हि.एल.एरंडे | मुक्तरंग प्रकाशन, लातूर. |
| [४] | Human Rights Concept & Issues | J.Shivananda | Alpha Publication, Delhi. |
| [५] | आंतरराष्ट्रीय राजकारण | के.सागर | के.सागर प्रकाशन, पुणे. |
| [६] | UNICEF Report २००९ | | |


डॉ. शेख ... अहमद
हिंदी विभाग
सहा.प्राध्यापक एवं शोधनिर्देशक
हु.ज.पा.महाविद्यालय हिमायतनगर